जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

सोमवार दि.२५ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ७९

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४


### विजयात लाडक्या बहिणींचा वाटा खूप मोठा

# माझ्या मतदारसंघात जरांगेंचा परिणाम निश्चितपणे झाला, परंतु इतर मायनॉरिटीजने तारले-भुजबळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी महायुतीच्या विजयावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच लाडक्या बहीणींचा या विजयात मोठा वाटा असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. मनोज जरांगेंचा परिणाम केवल माझ्या मतदारसंघात मला पाहायला मिळाला आणि त्याचा परिणाम देखील झाला असल्याचे भुजबळ म्हणाले आहेत. छगन भुजबळ म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकीनंतर जे नैराश्य आले होते ते नैराश्य दूर करण्यामध्ये देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या सर्व सहकाऱ्यांना घेऊन प्रचंड मेहनत घेतली आहे. विशेषतः अजित पवार सकाळी ६ वाजता बाहेर पडायचे आणि रात्री उशिरा यायचे. सगळ्यांनीच खूप मेहनत घेतली. लोकांमधील संभ्रम दूर केला आणि या सगळ्यात लाडक्या बहिणीचा वाटा खूप मोठा आहे. वेळेवर सगळ्या बहिणींना पैसे मिळतील याचे नियोजन अजित पवारांच्या खात्याने केले. त्यामुळे सर्वांना खात्री पटली की हे सरकार जे बोलत आहे ते करत आहे. त्यामुळे जनतेने आपल्यावर विश्वास दाखवला, असे छगन भुजबळ म्हणाले.शरद पवारांबद्दल बोलताना छगन भुजबळ म्हणाले, शरद पवारांनी माझ्या मतदारसंघात सभा घेतली तसेच माझ्या विरोधात कोणता उमेदवार द्यायचा याचा सगळ्याचा त्यांनी व्यवस्थित अभ्यास केला होता. त्याप्रमाणे त्यांनी निर्णय घेतले. पण आमचे मित्र जरांगे त्यांचे काय काम होते? त्यांनी तर सांगितले होते की मी या निवडणुकीत पडणार नाही, पाडणार नाही, बोलणार नाही, माझा कोणाला पाठिंबा नाही, माझा कोणाला विरोध नाही. पण प्रचार संपण्याच्या आदल्या दिवशी सकाळी १० वाजल्यापासून रात्री २ वाजेपर्यंत हाताला सलाईन आणि मी पाहा, मी आजारी आहे, माझे काहीही आता होईल, मी समाजासाठी मरतोय, यांनी विरोध केला आणि यांना पाडा. परंतु माझ्या मतदारसंघात त्याचा परिणाम निश्चितपणे झाला, माझ्या मताधिक्यावर त्याचा परिणाम झाला. परंतु, ते जेवढे झाले तेवढेच इतर जे मायनॉरिटीज आहेत, अगदी हिंदू असतील, मुस्लिम असतील, आदिवासी, ओबीसी सगळे एकवटले आणि त्यांनी आमचे तारू जे आहे ते किनाऱ्याला लावले.आम्ही फक्त आमचा नेता विधिमंडळाचा अजितदादा पवार यांची सर्वानुमते नेमणूक केली आहे. आता शिंदे यांचे नेतेपदी कोण आहे, भाजपचे नेतेपदी कोण आहे ते अजून कळायचे आहे. परंतु आमचा देवेंद्र फडणवीस यांना विरोध असण्याचा काही कारण असेल असे मला तरी वाटत नाही.







नवनिर्वाचित आमदार श्री प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांचा साई सुभाष निवासस्थानी वसंतनगर नांदेड येथे ८८ लोहा कंधार मतदारसंघातून माय-बाप जनता व बंधू भगिनींच्या आशीर्वादाने प्रचंड मतांनी विजयी झाल्यानंतर कुटुंबाने गुलाल उधळत, पेढे भरवत, औक्षण केले व शुभेच्छा दिल्या.(छाया - बाजीराव पाटील गायकवाड)

# लिंबोटी धरणातून कालव्याद्वारे शेतीला पाणी २५ तारखेपर्यंत सोडा

## शिवसेना युवा नेते नवनाथ रोहिदास चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

आचारसंहितेच्या नावाखाली लिंबोटी च्या धरणातून पाणी घालून सोडण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ होत असून सद्या नोव्हेंबर महिना संपत आला असूनही उर्ध्व मानार लिंबोटी प्रकल्पातील पाणी साठा शंभर टक्के असूनही पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अद्याप कोणतीही सुचना संबंधितांना देण्यात आल्या नाहीत. कालवा सल्लागार समितीचे सदस्य सचिव तथा सहाय्यक अभियंता एस.एन. फुलारी, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता आशिष चौगुले, शाखा विभागाचे अक्षय राजपूत, सिंचन शाखाधिकारी बालाजी रानवळकर, लातूर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता महेंद्र काळे हे दिरंगाई का करत आहेत.लिंबोटी धरणातून कालव्याद्वारे शेतीला पाणी २५ तारखेपर्यंत सोडा असेही नवनाथ बापूसाहेब रोहिदास चव्हाण प्रस्तूत प्रतिनिधींशी बोलताना म्हणाले.

उर्ध्व मानार प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा हा भरपूर प्रमाणात उपलब्ध असूनही पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या केवळ केली असता यावर्षी पाऊस भरपूर झाल्यामुळे उर्ध्व मानार लिंबोटी प्रकल्पात पाणीसाठा शंभर टक्के उपलब्ध असूनही लिंबोटी धरणाच्या प्रकल्पातून कालव्याद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या निर्णयासंदर्भात अजूनही बैठक घेण्यात आली नाही.सध्या ऑक्टोबर महिना संपून नोव्हेंबरचा शेवटचा आठवडा सुरू होत आहे.जर पाणी सोडण्यास दिरंगाई झाली तर रब्बी हंगामासाठी



पोषक वातावरण राहणार नाही मुबलक प्रमाणात उत्पादन न होता उत्पादनात घट होईल असेही चव्हाण म्हणाले.लिंबोटी धरण प्रकल्पाच्या कालव्यात जागोजागी काटेरी झुडपे झाली असून साफसफाई अजूनही कुठेच केलेली नाही. पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित बाबीची गांभीर्याने तात्काळ

> **कालवा दुरुस्तीचे काम चालू आहे.पुढील आठवड्यात बैठक होणार आहे.डिसेंबर मध्ये शेतीला पाणी पुरवठा केला जाईल.**
> **एस.एन. फुलारी, सहाय्यक अभियंता**

दखल घेऊन पाणीपुरवठा जर वेळेत केला तर शेतकऱ्यांचे पुढील काळातील नुकसान होणार नाही.त्यासाठी लिंबोटी धरणातून कालव्याद्वारे शेतीला पाणी २५ तारखेपर्यंत सोडा असेही युवा नेते नवनाथ (बापूसाहेब) रोहिदास चव्हाण म्हणाले.

# शेतकऱ्यांच्या शेतीमाल भावासाठी आंदोलन छेडणार-डॉ.मुकुंदराव पाटील बेलकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक निकालात महाराष्ट्रातील मतदारांचा कौल महायुतीकडे दिसून आला हा विजय महायुतीचा नसून ईव्हीएम मशीनचा आहे,राज्यातील जनतेसमोर अनेक प्रश्न असताना त्यांची या निवडणुकीत महायुतीबाबत नकारार्थीपणाची भूमिका होती निवडणूक निकालाचे हे दृश्य दिसून आल्यानंतर हा विजय मतदारांचा नसून ईव्हीएम मशीनचा आहे याबाबत आपण निवडणूक आयोगाकडे रितसर तक्रार करणार असल्याची भूमिका पुरोगामी सरपंच संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर मुकुंदराव पाटील बेलकर यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली.



नायगाव विधानसभा मतदारसंघात पुरोगामी सरपंच संघटने कडून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात डॉक्टर मुकुंदराव पाटील बेलकर यांची उमेदवारी देखील होती आपल्या पराभवानंतर ते मतदारांचे आभार मानून नवनिर्वाचित खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांचेही ते अभिनंदन केले पत्रकारांशी बोलताना पुढे म्हणाले की, मतदारांना मोकळा श्वास घेऊन लोकशाही मार्गाने मतदान करता आले नाही तर मतदारांना पैसे देऊन मत खरेदी केली गेले याविषयी आपण तक्रार करणार आहोत, हा देश कृषी प्रधान देश असून शेतकऱ्यांच्या वाट्याला आजवर समस्याच निर्माण राजकीय लोकांनी केले म्हणून शेतकरी वर्गांचा शेतीमाल कापसाला ११००० रुपये भाव

> **पुरोगामी सरपंच संघटना ही विविध घटकासाठी अविरतपणे काम करेल यातून अनेक प्रश्न मार्गी लागतील अनेक विधायक काम या संघटनेच्या माध्यमातून आपण करणार आहोत.**
> **डॉ.मुकूंदराव पाटील बेलकर**

मिळाला पाहिजे, विघुत पुरवठा मोफत दिली जावी आणि सोयाबीन आठ हजार रुपये प्रति क्विंटल मिळावा.व उसाला तीन हजार सहाशे रुपये भाव देण्यात यावा या मागणीसाठी आपण पाठपुरावा करणार आहोत सरकारचे या मागण्याविषयी दुर्लक्ष होत असल्यास आपण पुरोगामी सरपंच संघटनेच्या वतीने आंदोलन देखील करणार आहोत असेही डॉक्टर बेलकर पाटील म्हणाले.

# पळसखेड मलकदेव शिवारातील वनविभागाच्या जंगलात अज्ञात व्यक्तीने घेतला गळफास

## सदर व्यक्तीचा मृत्यू की घातपात परीसरात चर्चेला ऊत?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेड राजा पोलिस स्टेशन अंतर्गत पळसखेड मलकदेव गोपालखोरा शिवारातील वनविभागाच्या जंगलात पळसपाग्रा झाडाला अज्ञात ३२ वर्षीय पुरूषाने गळफास घेऊन २४ नोव्हेंबर रोजी आत्महत्या केल्याची माहिती उघडकीस आली आहे सदर व्यक्तीने आत्महत्या केली का या व्यक्तीचा खून करून हे प्रेत झाडाला लटकविण्यात आले अशी परीसरात चर्चा रंगत आहे.सिंदखेडराजा पोलिस स्टेशन अंतर्गत फिर्यादी- भाउसाहेब डिंगांबर कव्हळे वय ५९ वर्ष धंदा शेती ( पोलीस पाटील ) रा निमखेड यांनी नमुद२४ नोव्हेंबर रोजी १० वाजता पळसखेड मलकदेव । शिवारातील वनविभागाच्या जंगलात पळसपाग्रा झाडाला गळयाला दोरी बाधुन लटकलेला अवस्थेत असुन मरन पावलेला आहे वरून तोंडी रिपोर्ट दिला त्यानुसार सिंदखेडराजा पोलिसांनी मर्ग दाखल करून कायमी मर्ग क्र -३३ २४ कलम १९४ BNSS गुन्हा दाखल करून मा पो निरीक्षक शेळके यांच्या आदेशाने तपास API तुषार जाधव याच्याकडे देण्यात आला असून तपास सुरू आहे.





**झाडे लावा झाडे जगवा**

### चारोळी

शब्द देई उभारी
शब्द करी मारा
शब्द देई नवी दिशा
शब्द निसटता तारा.

**रंजना सानप**
**मायणी (सातारा)**

# आ.राजेश पवार यांच्या विजयाचा उमरीत जल्लोष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी. नायगाव विधानसभा निवडणुकीत भाजपचे आमदार राजेश संभाजी पवार यांचा विजय झाला त्यानंतर उमरी तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे उमरी शहरातील नगरपालिकेसमोर फटाक्याची आतिषबाजी गुलाल उधळण करण्यात आली त्यानंतर साखर वाटून आनंद साजरा केला या विजयामुळे पुन्हा एकदा नायगाव मतदारसंघावर भाजपचा झेंडा फडकला नायगाव विधानसभा मतदान संघातील दिनांक २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडल्याने शनिवारी दिनांक २३ नोव्हेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ नांदेड येथे मतमोजणी पार पडली या मतमोजणीत भाजपची आमदार राजेश संभाजी पवार हे विक्रमी मताधिक्याने दुसऱ्यांदा विजयी झाले त्यांनी काँग्रेसच्या डॉक्टर मीनल खतगावकर यांना दारुण पराभव केला आहे.

त्यांच्या विजयाचा उमरीच्या शहरात जलोष करण्यात आला यावेळी शासकीय गुत्तेदार संजय सवई.मा. नगराध्यक्ष संजय कुलकर्णी.मा. नगराध्यक्ष सुभाष पेरेवार. मोहम्मद खाजा शेठ. बापूसाहेब पाटील कौटुगांवकर. ज्ञानेश्वर पाटील सावंत. गजानन माली पाटील. बाबुराव नाईक राठोड.अविनाश पाटील कदम. बालाजी माचेवाड.उत्तम जाधव मोखाडीकर. ईश्वर रणवरे. रईस पठाण. दत्ता हरी पाटील पवार. बालाजी खांडरे. बालाजी दांडेवाड. प्रशांत सीतावर. आकाश अचकूलवार.राष्ट्रवादीचे अध्यक्ष महेश पडोळे. गंगाधर सलगरे.शिवदास गुंडेवाड .छोटू वर्मा . निरंजन मारावर. युसुफ शेख. उपस्थित होते.



## संपादकीय

# ‘वारसा’ जपण्याचा ध्यास

वारसा... एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे सुपूर्द केला जाणारा खजिना. मग तो ज्ञानाचा असो, अनुभवाचा, कलेचा किंवा परंपरेचा. हा वारसाच माणसाचं आयुष्य समृद्ध आणि सुसंस्कृत बनवतो. कोल्हापूरसारख्या ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी तर कला, क्रीडा, परंपरा, इतिहास या साऱ्याचा वारसा अनेकविध रूपांमध्ये दिसतो. एकीकडे आसमंतात पन्हाळगड-विशाळगडसारखे शौर्यगाथांचे खंबीर साक्षीदार, तर दुसरीकडे मातीतल्या कुस्तीसारख्या खेळाची रग अंगात भिनलेली... या अशा मातीत छत्रपती शिवरायांसारख्या द्रष्ट्या सेनानीने रुजवलेली ‘शिवकालीन युद्धकला’ फुलली नसती तरच नवल!बलाढ्य आणि शस्त्रसज्ज मुघल सेनेशी मोजके मावळे आणि तुटपुंजी शस्त्रं घेऊन लढताना शिवरायांनी गनिमी काव्याचा अफलातून वापर केला. यासाठी शिवरायांनी जी शस्त्रविद्या विकसित केली, तीच शिवकालीन युद्धकला. पुढे इंग्रज राजवटीत युद्धासाठी तिचा वापर थांबला, तरी कला म्हणून ती जिवंत राहिली; किंबहुना कित्येक वस्तादांनी आपलं आयुष्य खर्ची घालून ती जिवंत ठेवली. आज मात्र या समृद्ध वारशाला काहीशी उतरती कळा लागली असून शासकीय आणि एकूणच अनास्थेमुळे इतका अमूल्य ठेवा उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिला आहे...

हे सगळं एका तरुण सर्जनशील कलावंताच्या नजरेस पडलं. हा तरुण मूळचा कोल्हापूरचाच. मुंबईत एका प्रथितयश जाहिरात संस्थेत अनेक वर्षे काम केल्यानंतर आपल्या गावात राहून आपल्याला भावणाऱ्या विषयांवर काम करावं हा ध्यास घेतलेला. त्याचं नाव सचिन सूर्यवंशी. कोल्हापूरकरांचं अलौकिक फुटबॉलप्रेम हा विषय घेऊन त्यानं माहितीपट बनवला, ‘द सॉकर सिटी’. या माहितीपटाला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. या पुरस्कारानं त्याचा आणि त्याच्या साथीदारांचा हुरूप वाढला. त्यानंतर अचानक त्याच्यासमोर विषय आला तो म्हणजे मर्दानी खेळ, अर्थात ‘शिवकालीन युद्धकला’. आपल्या चिकित्सक स्वभावाला अनुसरून सचिननं त्या विषयाच्या अभ्यासात स्वतःला झोकून दिलं. या विषयावर एक सखोल माहितीपट करण्याची गरज आहे, हे त्याला जाणवलं. मग या विषयाशी संबंधित वाचन, संशोधन, त्यातील तज्ज्ञ व्यक्तींच्या भेटीगाठी अशी सगळी तयारी करून कामाला सुरुवात झाली. पाठीशी कुणी मोठा निर्माता किंवा आर्थिक पाठबळ नसलं तरी प्रचंड ध्यास आणि मित्रांचा मदतीचा हात या भांडवलावर काम सुरू झालं. मर्यादित साधनं, विशेषतः आर्थिक मर्यादा लक्षात घेत काटेकोर नियोजन करून काम करणं आवश्यक होतं.

काही गोष्टी चित्रित करण्यासाठी मोठा कॅमेरा आवश्यक असला तरी सतत कॅमेरा भाड्यानं घेणं परवडणार नाही, हे लक्षात घेऊन काही भाग हा मोबाइल फोनचा कॅमेरा वापरून शूट करायचं ठरलं. अर्थात मोबाइलचा कॅमेरा आणि विशेषतः माईक यांच्या मर्यादा हे महत्त्वाचं आव्हान पेलायचं होतं. हा माहितीपट असला तरी फक्त लोकांच्या मुलाखती घेऊन आणि शस्त्रांची छायाचित्रं टाकून विषय संपवायचा नव्हता. शस्त्रं चालवतानाचे शॉट्स, त्यामागील सुरसरम्य कथा सांगणारी मंडळी, मर्दानी खेळ शिकवणारे वस्ताद, शिवाय या खेळाचा इतिहास, त्यात शिवरायांपासून महाराणी ताराराणी ते राजर्षी शाहू महाराज या सर्व थोर व्यक्तींचं योगदान असा खूप मोठा पट मांडायचा होता; तोही मर्यादित कालावधीत आणि परिणामकारक पद्धतीनं. यातील काही भाग (उदा. शिवरायांच्या मावळ्यांचे प्रसंग, त्यांची मनःस्थिती) हा काल्पनिक (फिक्शन) पद्धतीनं दाखवायचं ठरलं; तर जिजाऊंपासून बाजीप्रभू देशपांडे यांच्यापर्यंत पराक्रमाच्या गाथा निमेशनच्या माध्यमातून मांडायचं ठरलं.आणि एक दिवस अचानक मला सचिनचा फोन आला. ‘मी सध्या एका माहितीपटावर काम करत आहे. आपण दोघांनी एकत्र काम करावं, अशी अनेक वर्षांपासूनची इच्छा आहे. या माहितीपटात शस्त्रांचे आवाज आणि एकूणच ध्वनीची महत्त्वाची भूमिका आहे. तेव्हा तू हे काम करावंस असं मला वाटतं.’ त्याआधी मी सचिनशी माझी फक्त एकदाच भेट झालेली. पण एका भेटीतच आमचे सूर जुळलेले. त्याच्यासोबत काम करण्याची संधी मलाही हवीच होती...मग ‘वारसा’च्या साऊंडवर चर्चा झाली. माहितीपटात दिसणाऱ्या सर्व शस्त्रांचे आवाज रेकॉर्ड करायचे होते, त्याशिवाय फिक्शन, निमेशन भागांसाठी ध्वनीसंयोजन करायचं होतं. शस्त्रांचे आवाज रेकॉर्ड करणं हे वरकरणी सोपं वाटलं, तरी प्रत्यक्षात आव्हानात्मक काम आहे. मर्दानी खेळासाठी वापरली जाणारी अस्सल शस्त्रं, ती चालवता येणारे जाणकार, आजूबाजूला कसलाही गोंगाट नसलेली शांत जागा, हे आवाज रेकॉर्ड करण्यासाठी योग्य साऊंड इक्विपमेंट (उत्तम रेकॉर्डर आणि दर्जेदार स्टीरिओ माईक) अशी सर्व जुळणी करून कामाला सुरुवात केली.

कोल्हापूरजवळ असलेलं सव्यसाची गुरुकुल हे एक भन्नाट ठिकाण आहे. तिथे मर्दानी खेळ आणि एकूणच भारतीय खेळांविषयी शालेय वयापासूनच विद्यार्थ्यांना सर्वांगीण प्रशिक्षण दिलं जातं. तिथले प्रमुख लखन जाधव हे या विषयातले केवळ जाणकार नव्हे, तर या विषयाला वाहून घेतलेले समर्पित अभ्यासक आहेत. त्यांनी आम्हांला सर्व शस्त्रांचा परिचय करून दिला आणि त्यांचे आवाज योग्य प्रकारे रेकॉर्ड करण्यात मोलाची मदत केली. हे काम माझ्यासाठी खरोखर संस्मरणीय ठरलं. तलवारीचं धारदार पातं जेव्हा माईकपासून दोन इंचावरून हवा कापत जातं, किंवा पट्ट्याच्या लवलवत्या पात्यानं जेव्हा निमिषार्धात लिंबाचे दोन भाग होतात, तेव्हा हेडफोन्समध्ये ऐकू येणारा आवाज एकाच वेळी सुखावणारा, अंगावर काटा आणणारा आणि धडकी भरवणारा असतो!अशा प्रकारे शस्त्रांचे आवाज ‘ऑथेंटिक’ पद्धतीनं रेकॉर्ड करता आले. ते माहितीपटात योग्य प्रकारे लावण्याच्या कामात माझा सहकारी उमाकांत जगताप यानं मदत केली. माहितीपटाला डॉ. शरद भुताडिया यांच्यासारख्या मातब्बर कलाकाराच्या आवाजात निवेदन मिळालं. तर आमचा मित्र सुविख्यात संगीतकार आणि संगीतसंयोजक अमित पाध्ये यानं समर्पक असं पार्श्वसंगीत दिलं. या संगीतातून तो काळ आणि माहितीपटामागील विचार दोन्ही यथायोग्य रीतीने पोहोचतात. शेवटी या सर्व गोष्टी एकत्र करून त्याचे सुयोग्य मिश्रण (मिक्सिंग) करणं, ही आनंददायी प्रक्रिया म्हणजे शेवटचा टप्पा!यथावकाश माहितीपट तयार झाला आणि अल्पावधीतच त्याला ‘फिल्मफेअर’ पुरस्कार मिळाला! सर्वांना आनंद झाला. मात्र मनातून वाटत होतं, की याला राष्ट्रीय पुरस्कार मिळायला हवा, इतका महत्त्वाचा विषय मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचायला हवा. आणि तेही घडलं! गेल्या आठवड्यात जाहीर झालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये ‘वारसा’ला ‘नॉन-फीचर’ प्रकारात ‘कला आणि संस्कृती यावरील सर्वोत्कृष्ट लघुपट’ हा बहुमान मिळाला. या मातीतल्या, महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासातल्या एका महत्त्वाच्या विषयावरील माहितीपट राष्ट्रीय पातळीवर नावाजला गेला. मनापासून, झोकून देऊन फिल्म बनवणाऱ्या सचिनच्या आणि आमच्या संपूर्ण टीमच्या मेहनतीचं चीज झालं. आता सचिननं हाती घेतलेल्या इतर प्रकल्पांचं काम पूर्णत्वास जायला या पुरस्कारानं बळ मिळेल, अशी आशा आहे.मुख्य म्हणजे, या माहितीपटातून ज्या शिवकालीन युद्धकलेची अर्थात मर्दानी खेळाची सद्यस्थिती मांडली आहे, त्या खेळाला ऊर्जितावस्था मिळावी हीच यानिमित्ताने प्रार्थना. शालेय अभ्यासक्रमातील क्रीडाप्रकारांमध्ये या मर्दानी खेळाचा समावेश व्हावा, ही आम्हा सर्वांची इच्छा असून सचिनचे त्या दृष्टीनं प्रयत्न देखील सुरू आहेत. ते ज्या दिवशी घडेल, त्या दिवशी हा माहितीपट आणि त्याला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार खऱ्या अर्थानं सत्कारणी लागेल.

# चातुर्य शहाणें झालें...

आधुनिक मनोविकारशास्त्रावरची मान्यताप्राप्त पुस्तके लिहिली पाश्चिमात्य संशोधकांनी. मॉडर्न मेडिसिनचा उगम तिथला. आमचे रुग्ण इथले! पाश्चात्य समाजात व्यक्तीच्या अंतस्थ प्रेरणा, इच्छा, भावना यांचा मुक्त आविष्कार हा त्यांच्या स्वभावाचा सर्वमान्य गाभा. या उलट पौर्वात्य संस्कृतीत माणूस हा या समाजसंस्थेचा एक पूरक घटक आहे. संस्कृती केंद्रस्थानी, माणूस तिच्या नियमांनी बांधलेला. पाश्चिमात्य समाजात व्यक्ती केंद्रस्थानी, पौर्वात्य संस्कृतीत समष्टी. कुठले चांगले कुठले वाईट हा प्रश्न नाही, हा संस्कृतीतला मूलभूत फरक.



रुग्ण डॉक्टरकडे विकृती घेऊन येतो तशी संस्कृतीही घेऊन येतो. मानसिक विकारांत तर रुग्णाची लक्षणे, विकाराचे स्वरूप आणि उपचाराची दिशा सारेच त्याच्या सांस्कृतिक मानमान्यतेच्या रंगात भिजलेले. आफ्रिकेपासून अमेरिकेपर्यंत जगभरात कुणालाही होवो, मोतीबिंदू आणि कर्करोगाची लक्षणे आणि उपचार यांत फरक नाही; मात्र स्किझोफ्रेनियात होणारे भास-भ्रम, त्यांचे स्वरूप, उपचाराची दिशा यावर रुग्णाच्या पारंपारिक समजुती आणि संस्कृती याचा मोठा प्रभाव पडतो. सुशिक्षित, शहरी माणसांवर कमी पडत असेल, अर्धनागरी रुग्णांवर अधिक असेल. लोक माझ्या विरुद्ध आहेत, कुणी माझ्या वाईटावर आहे, असे संभ्रम संशयी स्किझोफ्रेनियात नेहमी दिसतात. मात्र छोट्या गावात अगदी शारीरिक आजार झाला तरी असे संशय जवळजवळ प्रत्येकजण व्यक्त करतो. ती त्यांची परंपरेने चालत आलेली विचारसरणी. त्याचा स्किझोफ्रेनियाशी संबंध जोडावा की जोडू नये हे ठरवणे, उपचारातही अशा समजुतींचा उपयोग रुग्णाच्या भल्यासाठी करता येणे ही सूज्ञता. दरवेळी ती डॉक्टरच दाखवतो असे नाही, रुग्णाचा हुशार नातेवाईकही दाखवतो! माझ्याकडे एक माणूस आपल्या तरुण मुलीला स्किझोफ्रेनियाच्या उपचारासाठी घेऊन येई. तिला वर्षा-दोन वर्षाला त्रास होत असे. औषधोपचार केला की ती त्वरित बरी होऊन परत जाई. दरम्यान, त्याने तिचे लग्न लावून दिले. मुलगी सासरी गेली. वर्षभरात तिला पुन्हा झटका आला. बाप लगेच धावला, सासरहून पोरीला उचलून थेट माझ्याकडे आला. नेहमीप्रमाणे काही दिवसांत ती पूर्ण बरी झाली. मी विचारले, तू जावयाला, व्याह्याला काय सांगितलेस? तो म्हणाला मी त्यांना आधीच कल्पना दिली आहे, की आमच्या घराण्यावर करणीचा प्रभाव आहे. त्याचा त्रास वर्ष-दोन वर्षाला आमच्या मुलीला भोगावा लागतो. पण काळजी करू नका, मी लगेच त्याचा बंदोबस्त करून टाकत जाईन! उपचार तुमच्याकडेच, कारण हा आजार आहे हे मला पक्के ठाऊक आहे. मनोविकारांच्या वर्गीकरणाची अमेरिकास्थित सर्वोच्च संस्था आपल्या ‘डायग्नोस्टिक अॅन्ड स्टॅटिस्टिकल मॅनुअल’च्या ताज्या पाचव्या आवृत्तीत काय म्हणते? ‘मनोविकार हे माणसांच्या संस्कृतीशी बांधले गेले असल्याने, त्यांचा उपचार करताना रुग्णाच्या बिलिफ सिस्टीमचा, म्हणजे थोडक्यात त्याच्या पारंपारिक समजुतींचा उपयोग करून घेतला पाहिजे.’ या बापाने पोरीचा संसार सुरळीत व्हावा म्हणून दुसरे काय केले? पाव शतकाच्या प्रवासात निघालेला हा निष्कर्ष.

मानसशास्त्राचा उगम तत्त्वज्ञानातून झाला. तत्त्वज्ञान हा रोजच्या जगण्याचा गाभा, मात्र विनोबा म्हणतात तसे ‘तत्त्वज्ञान हे म्हातारपणी वाचायचे असते या समजुतीमुळे तारुण्य आणि तत्त्वज्ञान दोन्ही वाया जाते!’ आत्मस्वीकार ही अनेक मानसिक समस्यांवर उताऱ्याची पाहिली पायरी, मात्र त्यासाठी तत्त्वदृष्टी हवी.

मेंदूतील लिंबिक सिस्टीम हे भावनेचे केंद्र तीस कोटी वर्षांपूर्वीचे, तर पूर्व-प्रमस्तिष्क हे तर्कबुद्धीचे केंद्र फक्त दोन कोटी वर्षापूर्वीचे. म्हणून तर्काधारित विचारवृत्तीवर भावना प्रभावी ठरतात हेही लक्षात ठेवणे गरजेचे. मानसिक विकार हे मेंदूतील रसायनांच्या असमतोलामुळे होतात हे खरे, पण या न्युरोट्रान्समिटर्सवर भोवतालच्या घटनांचा, आणि त्या घटना आमच्या मनात कसे तरंग निर्माण करतात याचा निश्चित परिणाम होतो. समजुती अवैज्ञानिक असतील, पण त्यांच्या परिणामाचे एक विज्ञान आहे. त्या तथ्यहीन असतील, पण त्यांचा मनावर घडून येणारा परिणाम मात्र तथ्यपूर्ण असतो, बरा किंवा वाईट दोन्ही अर्थाने. संपूर्ण वैज्ञानिक प्रयोगांनी सिद्ध केलेल्या औषधांना ‘प्लेसिबो’ इफेक्टच्या कसोटीतून जावे लागते, तो प्लेसिबो इफेक्ट काय? वैद्यकशास्त्रात एखाद्या औषधाची उपयुक्तता सिद्ध करायची असली तर त्याचा प्रयोग करताना सहसा रुग्णांचे दोन किंवा तीन गट पाडले जातात. एका गटाला खरे औषध, एका गटाला कुठलेच औषध नाही आणि एका गटाला औषधाच्या जागी कुठलीही उपयुक्तता नसलेली, निरुपद्रवी साखरेची गोळी देण्यात येते. अशा निरुपद्रवी औषधाला ‘प्लेसिबो’ म्हणतात. या प्लेसिबोमुळे अनेक आजारात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ३० ते ५० टक्के एवढे दिसून येते. ‘खरे औषध’ प्लेसिबोपेक्षा सांख्यिकीदृष्ट्या जास्त प्रभावी असेल तरच ते उपयुक्ततेची कसोटी पार करते असे समजले जाते.

सहसा मानसिक आजारात प्लेसिबो परिणाम जास्त दिसून येत असला तरी माणसाला ग्रासणाऱ्या अतिरक्तदाबापासून कर्करोगापर्यंत सगळ्याच प्रकारच्या शारीरिक आजारात, आपण औषधाने बरे होणार या कल्पनेने माणसांना कमी-अधिक प्रमाणात बरे वाटू लागते हे शास्त्रीय सत्य आहे. शरीरावर चेतासंस्थेचे नियंत्रण आणि चेतासंस्थेवर मेंदूचे, पर्यायाने मनाचे नियंत्रण; त्यामुळे आपली इच्छाशक्ती, स्व-जाणीव, अपेक्षा इत्यादींच्या एकत्रित परिणामातून माणूस व्याधीमुक्त होतो. प्लेसिबो इफेक्ट फक्त औषधापुरता मर्यादित नाही. डॉक्टरचा रुग्णांसोबत घडून येणारा संवाद उपचारावर आणि दुरुस्तीवर प्रभाव टाकणारा महत्वाचा घटक. रुग्ण, अमुक डॉक्टरच हवा असे का म्हणतात? कारण, तोच मला ठीक करेल, ही समजूत. यात त्या डॉक्टरचे कौशल्य, अनुभव, ज्ञान जितके महत्वाचे, तितकाच रुग्णाचा विश्वास. शेवटी समजुती या सामुहिक अनुभूतीतून आलेल्या असतात. चार लोक त्याला सांगतात, अमुक डॉक्टरने मला याहीपेक्षा मोठ्या व्याधीतून दुरुस्त केले आहे. मनोविकारांची लक्षणे कधीकधी एखाद्या खोल डोहाच्या पृष्ठभागावर उमटलेले तरंग असतात. ते वरवर जसे दिसतात, जसे दाखवतात तशी नसतात. त्यासाठी तज्ज्ञाला रुग्णाची नुसती मानसिकता नाही, प्र-मानसशास्त्र शोधावे लागते. मेटा सायकॉलॉजी. मानसिकतेची मानसिकता. त्याला रूढ निदानाच्या पलीकडे जाता आले पाहिजे. ते अनुभवाने येते. चिंतनाने येते. दुर्दैवाने सगळ्यांना येते असे नाही. कुत्र्याची भीती वाटणे हे मर्यादेत नॉर्मल. कुत्र्याची अकारण, अवास्तव भीती वाटणे हा फोबिया, मानसिक समस्या. मात्र मनाच्या खोल डोहात दडलेला अपराधभाव, त्यामुळे निर्माण होणारी दुश्चिंता (एंक्झायटी), ती कमी करण्यासाठी आत्मपीडेची सुप्त प्रेरणा हे व्यक्तीचे प्र-मानसशास्त्र. कुत्रा चावण्याच्या प्रकट दुर्भितीच्या तळाशी आत्मपीडेची सुप्त इच्छा वावरत असू शकते याचा थांग कुणाला लागेल? ग्रेसच्या शब्दांत...

मन कशात लागत नाही, अदमास कशाचा घ्यावा अज्ञात झऱ्यावर रात्री मज ऐकू येतो पावा... पाव शतकाचा रियाझ घडल्यावर अधूनमधून ऐकू लागतो आठवा सूर, अज्ञात पाव्याचा, आणि ‘प्रमेय रुचीस’ येऊ लागते!

# दिलखुलास देश - ’फ्रान्स’

मी मूळचा नगर जिल्ह्यातील श्रीरामपूरचा आणि अस्सल मराठी कुटुंबात लहानाचा मोठा झालेला. माझेही बालपण चारचौघांप्रमाणेच गेलेले आहे. अभ्यासात मी बरा होतो आणि नेमून दिलेले काम पूर्ण करायचेच, हा माझा स्वभाव होता. या माझ्या स्वभावानुसार पुरेसा अभ्यास करून मी ‘वाइन टेक्नॉलॉजी’मध्ये पदवी घेतली आणि त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी ‘एमबीए मार्केटिंग’चा पर्याय निवडून पार पाडला. पदव्युत्तर शिक्षण घेऊन नोकरी करायची वेळ आल्यावर लक्षात आले, की मी ज्या वाइन उत्पादन क्षेत्रात काम करू इच्छित आहे, त्या क्षेत्रात एमबीए मार्केटिंग केल्यावर मला फक्त सरोगसी मार्केटिंग म्हणजेच ‘अप्रत्यक्ष जाहिरात’ (उदा. ‘इंपीरिअल ब्लू - मेन विल बी मेन’) करावी लागणार होती आणि ते मला अजिबातच रुचणारे नव्हते. कारण भारतात वाइन किंवा लीकर उत्पादनांची थेट जाहिरात करण्यास बंदी आहे. त्यामुळे मग वाइन उत्पादन क्षेत्रात काम करावे, हा विचार मनात डोकावू लागला. त्यासाठी वाइन उत्पादनातील उच्च शिक्षण घेणे अपरिहार्य आहे आणि भारतात एकही संस्था वाइन उत्पादनातील उच्च शिक्षण देणारी नाही, ही बाब समोर आली. खरे सांगतो, उच्च शिक्षणाचा विचार करेपर्यंत, परदेशात शिकायला जाऊ, तिथे सेटल होऊ, असे एकही स्वप्न मला केव्हाही पडलेले नव्हते. पण आता पर्यायच नव्हता. त्यामुळे २००१मध्ये मी जगभरात वाइन कॅपिटल म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या फ्रान्समधील बोर्दो येथे जाण्याचा निर्णय घेतला.



बोर्दोला कॉलेजमध्ये गेल्यावर पहिल्यांदा धक्का बसला तो शिक्षकांमधील नाते पाहून. एकमेकांना नावाने हाक मारणारे शिक्षक असतात, हेच मुळी मला नवीन होते. इथले शिक्षक सगळ्या विद्यार्थ्यांना छान समजून घेऊन समजून सांगून पुढे नेत. कोणीही कुठलीही संकल्पना मांडो, शंका विचारो, त्याची उत्तरे देण्यासाठी शिक्षक तत्पर होते. प्रयोग करायला वाव होता. सुरुवातीच्या काही दिवसांनी इथे अर्थार्जनाची व्यवस्था पाहणे भाग असल्याने मी स्कॉलरशिपसाठी अर्ज केला. पण स्कॉलरशिप फक्त फ्रेंच विद्यार्थ्यांसाठी असल्याचे समजल्यावर, आता काय? असा प्रश्न आ वासून समोर उभा राहिला. त्या वेळी माझ्या शिक्षकांनी मला इंग्रजी शिकवण्याचा पर्याय सांगितला. त्या शिकवण्याच्या बदल्यात माझा खर्च भागेल इतकी रक्कम मला कॉलेजने स्टायपेंडच्या रूपात उपलब्ध करून दिली. स्वातंत्र्य आणि मुक्त वातावरण, आनंद किंवा लक्झरी या फ्रान्सच्या मातीत रुजलेल्या गोष्टी आहेत.या देशात जे आहे ते निगुतीने जोपासून त्यातून उत्पन्न कसे मिळेल, कसे वाढेल आणि त्याचा देशाला कसा उपयोग होईल, याचा काटेकोर विचार केला जातो. हा विचार इथल्या नागरिकांमध्ये रुजावा यासाठी अगदी शाळेपासून सरकार लक्ष देऊन असते. माझ्या कॉलेजचेच उदाहरण सांगतो. इथे वाइन उत्पादन शिकणारे विद्यार्थी उद्या व्यवसाय जगतात जाणार आहेत, हे लक्षात घेऊन दर चार महिन्यांनी प्रकल्पभेटीचे आयोजन करून तिथे प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली जाई. कॉलेजची स्वत:ची वाइन डिस्टिलरी आहे. स्वत:चा ब्रँड आहे. इथे विद्यार्थी उत्पादन, ब्रँडिंग, पॅकिंग अशा विविध कामांचा अनुभव घेतात. चोख काम करा. त्या करताना चुका झाल्या तर होऊ देत. त्यातून तुम्ही शिका, असा इथल्या खाक्या आहे. एक कॉलेज संपल्यावर एका वाइन कंपनीत इंटर्नशिप करण्याची संधी मिळाली. दीड वर्ष त्या कंपनीत झोकून देऊन काम केले. ‘प्रोफेशनल’ म्हणून काम करण्यासाठी मला इथल्या अनुभवांनी प्रचंड बदलून टाकले. मला इंग्रजी बोलता येत असे. सगळ्या भारतीयांप्रमाणे एकाच वेळी चार कामे करण्याचे कौशल्यही होते. त्यामुळे कंपनीच्या उत्पादन, विक्री, जाहिरात आणि अर्थ अशा सगळ्या विभागांत काम केले. हे बघून कंपनीच्या मालकाने अधिकाधिक कामे विश्वासाने माझ्यावर सोपवली आणि गुणवत्तेचे योग्य चीज होणे म्हणजे काय, याचा खराखुरा अनुभव दिला. इथे व्यक्तीच्या कामाला जोखतात. त्याच्या क्षमतांचे कौतुक केले जाते, हा अनुभव मला मिळाला.शिक्षण, नोकरी यासह फ्रान्समधील मित्रमैत्रिणींसह जुळवून घेणे हाही एक भाग होता. हे सारे जण अतिशय स्वतंत्र आणि स्पष्ट; पण दिलखुलासपणे जगणारे होते. त्यांच्यासोबत राहताना येणाऱ्या अनुभवांनी मला विचारांची स्पष्टता द्यायला सुरुवात केली आणि प्रत्येक गोष्टीचा म्हणजे अगदी नात्यांपासन ते प्रोफेशनल कामांच्या पद्धतींपर्यंत सगळ्याचा नव्याने विचार करायला भाग पाडले.या सगळ्या मित्रमैत्रिणींनी मला तिथल्या आचारविचारांशी सहजपणे मला कोणताही न्यूनगंड न देता, चेष्टा न करता परिचय करून दिला. अगदी साध्या गोष्टींचेही मला प्रश्न पडत. काटा-चमच्याने खाता येत नसे. सलाड किंवा चिकन काटा-चमच्याने कसे खायचे, हेच समजेना. काटाचमच्याने खाण्यासाठी बरेच दिवस खटपट करावी लागली. अखेरीस प्रयत्नांनी ते जमले, म्हणजे खरे तर जमवावे लागले. तीच गोष्ट वागण्या-बोलण्याचीही. भारतात सहज होणाऱ्या गोष्टी इथे अगदी अमान्य होत्या. मी पेइंग गेस्ट म्हणून राहत होतो, त्या आजीशी माझी छान मैत्री झाली. तिच्याशी गप्पा मारताना फ्रेंच संस्कृती आणि फ्रेंच माणसाचे राहणे-वागणे मला अधिक उलगडत गेले. ‘फ्रान्समध्ये आपण जे कपडे घालतो, त्या एकूण एक कपड्यांना इस्त्री केली जाते आणि तूही ते कर’ असे ‘बहुमूल्य’ ज्ञान तिने मला दिले. नुसते दिले नाही तर माझ्या एकूण एक कपड्यांना स्वतः इस्त्रीही करून माझ्या ‘फ्रेंच’ होण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकायला लावले. माझ्या सगळ्या फ्रेंच मित्रमैत्रिणींच्या मनात भारताविषयी असंख्य प्रश्न होते. भारतात हत्ती, घोडे, सिंह आहेत ना? भारतात गरिबी प्रचंड का आहे आणि मग तुमचे सरकार काही करीत नाही का? तुमच्याकडे जातिभेद प्रचंड आहे का? महात्मा गांधी आणि इंदिरा गांधी यांना का मारले अशा कित्येक प्रश्नांच्या फैरी फ्रेंच मित्रमंडळी माझ्यावर करू लागली होती. इतिहासाचा सखोल अभ्यास मी या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी फ्रान्समध्ये गेल्यावर केला. ही मंडळी माझ्या घरी येत. मी आमटी भात करून खात असे. त्या वेळी फ्रेंच मित्रमंडळींनी ‘तू फार मसालेदार जेवतोस. तुझ्या घरी आले की ‘करी’चा वास येतो. तू आमच्या सोबत गाडीत आलास तरी ‘करी’चा वास येतो’ असे म्हणून त्यांनी माझ्या घराला ‘करी हाउस’ असे नाव देऊन टाकले होते. यावर काय प्रतिक्रिया द्यावी ते मला कळतच नसे आणि मग हसून गप्प बसत असे. पुढे गाडी घेतली. इथले वाहतुकीचे नियम वेगळे. कार लेफ्ट हँड ड्राइव्ह. ड्रायव्हिंग, ओव्हरटेकिंगच नव्हे, तर रस्त्यावरून गाडी चालवताना माझी गडबड उडायला लागली. शेवटी मराठीमध्ये वाहतुकीचे नियम लिहून गाडीत चिकटवून टाकले. गाडीत बसलो, की आधी नियम पाहायचे असे सुरू केले. मग कुठे गाडी रूळावर आली. दुसरा प्रश्न होता वेळेचा. इथे उन्हाळ्यात सकाळी पाच वाजता सूर्य उगवतो आणि सूर्यास्त रात्री ११ वाजता होतो. दिवस १७ तासांचा आणि रात्र अवघी सहा-सात तासांची. रात्रीचे ११ वाजले तरी सूर्य मावळत नाही, हे माझ्यासाठी नवलाचे होते. अतिप्रचंड उन्हाळा किंवा अतिप्रचंड थंडी इथे नाही. सूर्यप्रकाश असणारा इतका मोठा दिवस असल्याने इथे झाडांची उत्तम आणि भराभर वाढ होते. त्यामुळे निसर्ग समृद्धता विपुल आहे. याचा फायदा वाइन उद्योगाने पुरेपूर करून घेतला आहे. मुळात वाइन शोधली रोमन लोकांनी. कालांतराने ते उत्तर युरोपात आले. आधीच दिलखुलास जगणाऱ्या फ्रेंचांनी आपल्याला मिळालेल्या नैसर्गिक देणगीचा वापर करून वाइन उद्योग इथे रुजवला, वाढवला आणि जगभरात नावाजला जावा यासाठी कष्ट घेतले. त्यासाठी शेतीत प्रयोग केले. फ्रेंचांनी वाइनला प्रतिष्ठा दिली. व्यवसायवृद्धीतून त्यांनी जीवनमान, जीवनशैली अधिक समृद्ध व्हावी, व्यवसायाचा फायदा देशाला व्हावा यासाठी नियोजनबद्ध कष्ट केले. वाइन उत्पादन शिकताना या गोष्टींची नोंद मनात होत होती. यातून माझ्या मनात वाइन उद्योग भारतात कसा रुजवता येईल, त्यासाठी काय करावे लागेल याची चक्रे सुरू झाली. त्यातूनच पुढे वाइन पॉलिसीचा प्रस्ताव मनात रुजला.

# आ डॉ.तुषार राठोड यांच्या विजयाने मुखेड विधानसभेवर महायुतीचा झेंडा फडकला

## मुखेडात कार्यकर्त्याकडून पुष्पवृष्टी करून रॅली द्वारे भव्य जल्लोष साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**





मुखेड : मुखेड विधानसभा निवडणुकीत भाजपा-शिवसेना महायुतीचे उमेदवार डॉ. तुषार गोविंदराव राठोड यांनी आपले प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे उमेदवार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांचा तब्बल ४० हजार मतांनी पराभव करत विजयाची हॅट्रिक साधली. अपक्ष उमेदवार बालाजी पाटील खतगावकर हे निवडणूक निकालात तिसऱ्या क्रमांकावर होते.निवडणूक निकालानंतर आ. डॉ. तुषार राठोड यांचे मुखेड शहरात आगमन झाल्यानंतर बाहाळी नाका परिसरातून उघड्या वाहनातून मिरवणूक काढत कार्यकर्त्यांनी भव्य रॅलीद्वारे विजयाचा जल्लोष साजरा केला.

सकाळी ८ वाजता नांदेड येथील विद्यापीठ परिसरातील ज्ञान स्त्रोत इमारतीत मतमोजणीला प्रारंभ झाल्यानंतर प्रारंभी पोस्टल बॅलेटची मतमोजणी करण्यात आली. या मतमोजणीत आ. डॉ. तुषार राठोड यांनी मोठी आघाडी घेतली. यानंतर ईव्हीएम मशीनमधील मतांची मोजणी करण्यात आली. पहिल्या फेरीपासूनच डॉ. तुषार राठोड यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्यावर तब्बल ३९ हजार मतांची आघाडी घेत तिसऱ्यांदा विजयावर शिक्कामोर्तब केला आणि विजयाची हॅट्रिक साधली. निवडणुकीचा निकाल घोषित झाल्यानंतर आमदार डॉ. तुषार राठोड यांचे मुखेड शहरातआगमन झाले. यावेळी कार्यकर्त्यांनी गुलाल आणि बेल भंडाराची उधळण करत आ. डॉ. तुषार राठोड यांचे पुष्पवृष्टी करुन भव्य स्वागत व अभिनंदन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत मोठा जल्लोष साजरा केला. यावेळी आमदार बंधू माजी नगराध्यक्ष गंगाधरराव राठोड, विधानसभा प्रमुख खुशालराव पाटील उमरदरीकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष बालाजी पाटील सकनूरकर, अशोकराव गजलवाड, नागनाथराव लोखंडे, व्यंकटराव लोहबंदे, लक्ष्मण पाटील खैरकेकर, शेखर देशमुख बान्हाळीकर, किरण पाटील बोडके, संगमेश्वर देवकते, गोटू पाटील बिल्लाळीकर, दत्ता पाटील बेटमोगरेकर, बालाजी नाईक कलंबरकर, हेमंत आप्पा खेकरे, बालाजी पसरगे, डॉ. अमोल कलेटवाड, नागनाथ कोटीवाले, उत्तमराव बनसोडे, राजू घोडके, मारुती पाटील गवळे, किशोरसिंह चौहान, गोविंद अण्णा केंद्रे, यशवंत बोडके, कपिल पाटील बनबरे, हनुमंत तडखेले, धीरज पाटील गोजेगावकर, हनुमंतराव नरोटे, डॉ. उमेश पाटील येवतीकर, संजयसिंह देवकते, नासिर खान पठाण, खाजा धुंदी, गौस बागवान, राजेश गजलवाड, करण रोडगे, विनोद दंडलवाड, शिवकुमार बंडे, बबन ठाकूर, देविदास गायकवाड, कुलदीप गायकवाड, बाळू नाईक जुनेकर, सुधीर चव्हाण, सचिन विजयी जल्लोष रॅली दरम्यान आ. डॉ. तुषार राठोड यांनी मुखेड शहराचे ग्रामदैवत श्री विरभद्र स्वामी यांचे दर्शन घेऊन महाआरती केली. यासोबतच कंधार फाटा येथे वडील स्व. आ. गोविंदराव राठोड आणि काका स्वर्गीय आ. किशनराव राठोड यांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर कमळेवाडी येथील आपल्या निवासस्थानी जाऊन मातोश्री माजी नगराध्यक्ष चक्रवतीबाई राठोड यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी आमदार भगिनी संध्याताई चव्हाण यांनी आमदार महोदयांचे औक्षण करून शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रताप राठोड, पुष्पाताई राठोड, ज्योत्स्नाताई राठोड यांच्यासह परिवारातील बंधू-भगिनी, नातेवाईक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.चव्हाण, सचिन पवार, संभाजीराव ताटे, प्रकाश जाधव, वसंत जाधव, बालाजीराव हाके, उत्तम अण्णा चौधरी, अनिल शेठ जाजू, जगदीश बियाणी, संदीप काळे, मिलिंद लोहबंदे, दीपक शेठ मुक्कावार, डॉ. झटकवडे गुंडोपंत दापका, गणेश पाटील जाधव, लक्ष्मीकांत दबडे आदींसह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिंगोली विधानसभेचे आ.तान्हाजीराव मुटकुळे यांना मंत्रिपद मिळावे

## भाजपा नगरसेवक तथा गटनेते अमोल तिडके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांचा तिसऱ्यांदा विधानसभेवर विजय झाल्याने हिंगोली जिल्ह्याकरिता आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांना मंत्रिपद मिळावे अशी विनंती भाजपा नगरसेवक तथा गटनेते अमोल भैया तिडके यांनी श्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विनंती केली आहे हिंगोली विधानसभेमधील अनेक विकास कामे झाले असून उर्वरित कामे आमदार मुटकुळे हे मार्गी लावतील परंतु हिंगोली जिल्ह्याकरिता भाजप आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांना मंत्रीपद द्यावे अशी मागणी नागरिकाकडून देखील होत आहे, हिंगोली विधानसभेतील विकासाचा भर देण्याकरिता आमदार मुटकुळे यांना मंत्रीपद द्यावे लागेल असे भाजप नगरसेवक तथा गटनेते अमोल भैया तिडके यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे,



# खानवटे गावात मढ्यावरच लोणी खाणारा कोण?





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड (बबनराव धायतोंडे)**

मानवी जन्माच्या आधीपासून (गर्भाधान संस्कार) ते त्याच्या मृत्यूनंतरही (दाहकर्म व श्राद्ध) केले जाणारे संस्कार हिंदू जिवनशैलीत प्रचलित आहेत.

दिवंगताविषयी आस्था,प्रेम,सद्भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून दाहकर्म व श्राद्ध या विधीकडे पाहिले पाहिजेत. परंतू खानवटे ता.दौंड येथे मागील तीन दिवसापूर्वी गावातील एका महिलेचा मृत्यू झाला होता आणि गावातील स्मशान भूमी येथे भीमा नदी तिरी त्यांचा अंत्यविधी करण्यात आला होता.

परंतु एका विकृत बुद्धीच्या इसमाने अंत्यविधी झालेल्या ठिकाणावरून मयताच्या हस्त्या अस्ताव्यस्त करत महिलेचे जोडवे आणि गळ्यातील सोने पहाटे पाचच्या सुमारास चोरून नेहले आणि तो सी सी टी व्ही कॅमेऱ्यात मोटरसायकल वरून येताना आणि जाताना पाहटेच्या पाच च्या सुमारास कैद झाला आहे.

# ८ वे पर्यावरण संमेलन आळंदी देवाची येथे होणार त्या संदर्भात नियोजन बैठक पुण्यात संपन्न

## पर्यावरण मंडळाचे राज्य अध्यक्ष श्री.प्रमोददादा मोरे यांचे पर्यावरण प्रेमींना नाव नोंदणीसाठी आवाहन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आज निसर्ग व सामजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य यांची रविवार दिनांक २४/११/२०२४ रोजी ८ वे पर्यावरण संमेलन २९ डिसेंबर २०२४ रोजी आळंदी देवाची येथे पार पडणार असून त्याची सहविचार सभा पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ पुणे येथे मंडळाचे अध्यक्ष श्री.प्रमोददादा मोरे यांच्या उपस्थित पार पडली.या सभेला आळंदी येथे आयोजित ८ वे पर्यावरण संमेलन आळंदी येथील कार्यक्रमा संदर्भात अध्यक्ष,व्याख्याते,पर्यावरण प्रेमी यांची राहण्याची व्यवस्था,जेवणाची सोय,क्षेत्रभेट,कार्यक्रमाचा हॉल इ.अनेक विषयावर चर्चा करण्यात आली.तसेच या पर्यावरण संमेलन संदर्भात जास्तीत जास्त पर्यावरण प्रेमींनी या संमेलनास आपला सहभाग दर्शवावा,त्यासाठी राज्यातील पर्यावरण प्रेमी यांनी जास्तीत जास्त नाव नोंदणी करावी असे आवाहन मंडळाचे राज्याध्यक्ष प्रमोददादा मोरे यांनी या बैठकीमध्ये सुचविले.या सभेला श्री.धीरज वाटेकर (सचिव),पुणे जिल्हाध्यक्ष श्री.मारुती कदम,श्री.भोजने चंद्रकात(जिल्हा संघटक) इ.पर्यावरण प्रेमी उपस्थित होते

## घरी बसणार नाही,राज्यभर फिरणार !

# निकाल मान्य,पुढील निवडणूका जोमाने लढणार : शरद पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बारामती । बबनराव धायतोंडे**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरघोस यश मिळालं आहे. महायुतीला अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळालं असताना महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला आहे. महायुतीला २३४ जागा मिळाल्या असून, भाजपाला १३२, शिवसेना ५७ आणि राष्ट्रवादी ४१ जागा जिंकली आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीला फक्त ५० जागा मिळाल्या असून,उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला फक्त २० जागा मिळाल्या आहेत.तर काँग्रेसला १६ आणि राष्ट्रवादीला १० जागा जिंकता आल्या. दरम्यान शरद पवारांनी साताऱ्यात पत्रकार परिषद घेत त्यांनी या निकालावर भाष्य केलं आहे.आमची जी अपेक्षा होती तसा निकाल नाही.पण शेवटी लोकांनी दिलेला निर्णय आहे.त्याचा अभ्यास करणं,कारणीमांसा करणं याची गरज आहे.नव्या उत्साहाने लोकांमध्ये जाऊन उभं राहावं लागेल, असं शरद पवार म्हणाले आहेत. महायुतीला लाडकी बहीण योजनेचा फायदा झाला का?असं विचारलं असता शरद पवार म्हणाले की,आम्ही लोकांकडून,कार्यकर्त्यांकडून जी माहिती घेतली त्यातून हे एक महत्त्वाचं कारण आहे असं ऐकायला मिळत आहे.आम्ही सत्तेत नसलो तर पैसे देणं बंद होईल असं सांगण्यात आलं.महिलांचं मतदान वाढलं आहे असं आताच्या आकडेवारीवरुन दिसत आहे. लोकसभेच्या निवडणुकीत ज्या प्रकारची भूमिका जनतेने घेतली होती,तशी आता घेतली नाही.सर्वांनी कष्ट केलं पण निकाल हवा तसा लागला नाही.अशी खंत शरद पवारांनी व्यक्त केली.तसंच ईव्हीएम आणि पैशांच्या आरोपांवर त्यांनी भाष्य करणं टाळलं.मी काही सहकाऱ्यांचं मत ऐकलं आहे,पण अधिकृत माहिती येत नाही तोर्यंत त्यावर भाष्य करणार नाही असं त्यांनी स्पष्ट केलं. बटेंगें तो कटेंगे यामुळे ध्रुवीकरण झालं. योगींनी केलेल्या विधानामागे मतांचं ध्रुवीकरण



व्हावं असा दृष्टीकोन होता. धार्मिक बाजू देण्याचा प्रयत्न काही जणांनी केला त्यामुळे हे झालं असं दिसत आहे असंही शरद पवारांनी सांगितलं. राज ठाकरेंचा एकही उमेदवार निवडून आला नाही असं सांगण्यात आलं असता ते म्हणाले की, त्यांचा एकही आला नाही आणि आमचेही फक्त १० आले. या निवडणुकीत आम्हालाही इतक्या कमी जागा मिळतील असं त्यांनाही वाटत नव्हतं. आम्हा लोकांची पिढी आहे त्यांच्यावर चव्हाणांचे संस्कार आहेत.त्यांचे विचार आम्ही मानतो.त्या विचाराने काम करणारे लोक त्याच्यातील मोठा वर्ग हा भाजपा आणि इतरांसह गेला आहे.ही वस्तुस्थिती आहे.या निवडणुकीत त्यांना यश मिळालं आहे.पण त्यांची पार्श्वभूमी पाहिली तर यशवंतराव चव्हणांच्या विचारावर काम करत होते हे नाकारता येत नाही.

बारामतीत कोणीतरी उभं राहायला हवं होतं.जर उमेदवार दिला नसता तर महाराष्ट्रात काय संदेश गेला असता. कोणीतरी निवडणूक लढण्याची गरज होती.अजित पवार आणि युगेंद्र पवार यांची तुलना होऊ शकत नाही याची आम्हाला कल्पना होती.अजित पवार गेल्या अनेक वर्षांपासूनचं राजकारण, सत्तेतील स्थान आणि नवखा तरुण एका बाजूला याची आम्हाला जाणीव होती, असंही शरद पवारांनी स्पष्ट केलं.

एखादा घरी बसला असता.मी काही घरी बसणार नाही.मी पुन्हा एकदा जोमाने, कतृत्वाने संघटना उभी करण्यासाठी दौरा करत आहे असा निर्धार शरद पवारांनी व्यक्त केला आहे. उद्या विजयी उमेदवारांची बैठक होणार आहे आणि परवा सर्व उमेदवार यांची जयंत पाटील यांच्या अध्यक्षते खाली बैठक होणार आहे त्याला मी ही उपस्थित राहणार आहे. संसदीय अधिवेशन सुरु असल्याने शपथविधीला उपस्थित राहता येणार नाही.सरकार अजून बनलेलं नाही, त्यामुळे त्यांच्याकडून आताच अपेक्षा ठेवणं योग्य नाही.महाराष्ट्राचा नावलौकिक कमी होता कामा नये असं मत त्यांनी मांडलं.मतदारापर्यंत काय काय पोहचवले जाते आहे त्याचा अभ्यास करावा लागेल.व्होट जिहाद मुळे धार्मिक ध्रुवीकरण करण्यात आल्याचे म्हणायला वाव आहे असंही त्यांनी सांगितलं.

# माजी आमदार बबनरावजी पाचपुते यांच्या वाघाने श्रीगोंद्याचा गड राखला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा - २२६ श्रीगोंदा- नगर विधानसभा मतदार संघांमध्ये झालेल्या चुरशीच्या लढतीमध्ये युवा नेते तसेच महायुतीचे अधिकृत उमेदवार विक्रम बबनराव पाचपुते यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार सौ अनुराधा नागवडे, मा. आ. राहुल जगताप, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार यांचा ३७१५६ मतांची आघाडी घेत दारुण पराभव केला. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून सर्वच उमेदवारांनी प्रचारांमध्ये आघाडी घेतली होती एकमेकावर आरोप प्रत्यारोप करत नेत्यांच्या प्रचार सभा घेत, मतदार संघामध्ये वातावरण एकदम तापवले होते. विजयाचे दावे प्रतितावे केले जात होते काही ठिकाणी तर पैजा लागल्या होत्या. मात्र पाचपुते कुटुंबाकडून ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर लढली गेल्याचे जनतेमधून बोलले जात होते. शनिवार दिनांक २३ रोजी झालेल्या मतमोजणी दरम्यान पहिल्या फेरी पासूनच विक्रम पाचपुते यांनी आघाडी घेतली. ती एकूण २५ फेरी होईपर्यंत त्यांची आघाडी वाढत जाऊन निर्णायक विजयापर्यंत पोहोचली. त्यांच्या विजयानंतर पाचपुते यांच्या कार्यकर्त्यांनी माऊली निवासस्थाना समोर फटाक्यांची आतिश बाजी करत ढोल ताशाच्या गजरात गुलालाची उधळण केली. सकाळी मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाचे उमेदवार यांच्यात विजयासाठी मोठी रस्सीखेच होईल असे वाटत होते. मात्र असे काहीच चित्र दिसले नाही. मात्र सहाव्या फेरीपर्यंत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या महाविकास आघाडीचे उमेदवार सौ. अनुराधा नागवडे या सातव्या फेरीपासून तिसऱ्या क्रमांकावर गेल्याचे पहावयास मिळाले. तर अपक्ष उमेदवार मा.आ.राहुल जगताप शेवटच्या फेरीपर्यंत दुसऱ्या क्रमांकावर राहिले. तर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अण्णासाहेब शेलार हे चौथ्या क्रमांकावर राहिले. आजपर्यंत कुठलीही निवडणूक न लढलेले



उमदा तरुण विक्रम पाचपुते थेट विधानसभेची निवडणूक लढवत विजय मिळवल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता.

यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना विक्रम पाचपुते त्यांनी सांगितले की निष्ठावंत शिलेदारांना बरोबर घेऊन विकास कामांच्या मुद्द्यावर आपण ही निवडणूक जिंकलो आहोत. यावेळी त्यांनी मतदारसंघातील जनतेचे आभार मानले स्व स्वार्थासाठी अनेक पक्षात कोलांट्या उड्या मारणारांना मतदारांनी आपली जागा दाखवून दिली अस म्हणाल तर वावगं ठरणार नाही विरोधकांन कडे कुठलंही विकासाची नसल्याने उठसुठ पाचपुते यांच्या वर टीका केली मात्र पाचपुते यांनी विकास कामांवर प्रचार केला आणि तोच प्रचार मतदारांना चांगलाच भावला माजी आमदार बबनरावजी पाचपुते यांच्या विकास कामांवर विश्वास ठेवून मतदारांनी विक्रम पाचपुते यांना प्रचंड अस मताधिक्य देऊन विजय मिळवुन दिला.

या मतमोजणीच्या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी गौरी सावंत, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. क्षितिजा वाघमारे, निवासी नायब तहसीलदार पंकज नेवसे, यांच्यासह प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी मतमोजणी प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. तसेच यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे व त्यांचे सहकारी अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

श्रीगोंदा- नगर मतदार संघातील उमेदवार व त्यांना मिळालेली एकूण मते पुढील प्रमाणे - १) विक्रम पाचपुते - (महायुती) ९९८२० (विजयी) (२) राहुल जगताप - (अपक्ष) ६२६६४ (३) अनुराधा नागवडे - (मविआ)५४१५१ (४) अण्णासाहेब शेलार - वंचित बहुजन आघाडी (२८०७०) (५) सुवर्णा पाचपुते - (१७२५) (६) ड. महेंद्र शिंदे - (बसपा)८०९ (७) संजय शेळके - (मनसे)१०८४ (८) गोरख आळेकर - ४७७४ (९) राहुल छत्तीशे - ४२४ (१०) विनोद साळवे - ५०६ (११) डॉ. अनिल कोकाटे - ६२९. (१२) दत्तात्रय वाघमोडे - ४११. (१३) नौशाद शेख - ३५९. (१४) रत्नमाला ठुबे - ३९५ (१५) दादा कचरे - २८९ (१६) सागर कासार - ४४७

# कार्यकर्त्यांशी थेट संपर्क व लाडक्या बहिणींमुळे आ.चिखलीकर यांचा विजय

## लोहा विधानसभा मतदारसंघात प्रतापरावच ठरले 'मन्याडचा वाघ '

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**कंधार । धोंडीबा मुंडे**

लोहा कंधार मतदार संघातील कार्यकर्त्यांशी सतत थेट संपर्क, प्रचार यंत्रणेचे सूक्ष्म नियोजन व युती सरकारची मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना यामुळे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी आपली विजयश्री खेचून आणली.

जि.प.सदस्य झाल्यापासून आमदार चिखलीकरांनी सतत मतदार व कार्यकर्त्यांशी थेट संपर्क वाढवला तसेच जि.प.च्या माध्यमातून अनेक लोकांची वैयक्तिक कामे करत जवळीकता वाढवली इ .स २००४ च्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने तिकीट नाकारल्यानंतर त्यांनी अपक्ष निवडणूक लढण्याची हिंमत दाखवली. त्यावेळी त्यांनी प्रत्येक समाजातील कार्यकर्त्यांना एकत्र करून निवडणूक लढवली व विजय प्राप्त केला. २००४ ते २००९ या पाच वर्षाच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांच्यामार्फत मतदारसंघात निधी आणून अनेक विकास कामे केले जात प्रामुख्याने लिंबोटी (अप्पर माणार )धरण पूर्णत्वास नेले.

२००९ साली परत त्यांनी अपक्ष निवडणूक लढवली परंतु त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.तरीसुद्धा त्यांनी पुढील पाच वर्षे मतदारसंघाचा संपर्क कायम ठेवला. तसेच जि. प. पं.स. नगरपालिका निवडणुकीत आपले कार्यकर्ते उभे करून निवडून आणले.

नंतर २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत चिखलीकर यांनी शिवसेनेच्या



तिकिटावर निवडणूक लढवली व विजय संपादन केला.त्यामुळे कार्यकर्त्यांशी त्यांचा थेट संपर्क कायम राहिला.परंतू इ.स. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांनी आ. चिखलीकरांना भाजपाकडून नांदेड लोकसभा निवडणूक लढवण्याची गळ घातली. त्या निवडणुकीत ते यशस्वीही झाले.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.तरीपण उमेद न हारता त्यांनी लोहा कंधार विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्याचे ठरवले.परंतू हा मतदारसंघ राष्ट्रवादीला महायुतीत सुटल्यामुळे त्यांनी राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करुन उमेदवारी मिळवली.

गेली पाच वर्षे मतदारसंघाचा संपर्क कमी झालेला,त्यातच बहीण आशाबाई शिंदेंची उमेदवारी, आणि महाविकास आघाडीकडे मराठा व इतर समाजाचा असलेला कल, तसेच ओबीसी समाजातून होणारा विरोध या सर्व आवाहनाचा सामना त्यांनी केला. या निवडणुकीत त्यांनी अतिशय सुक्ष्म नियोजन करून संपर्क तुटलेल्या कार्यकर्त्यांशी जवळीकता साधली. त्यामुळे प्रत्येक गावात त्यांची कार्यकर्ते मंडळी मनोभावे प्रचार करु लागली. तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे अनेक महिलांनी गुप्त पद्धतीने युती सरकारच्या उमेदवाराला भरभरून मते दिली. त्यामुळे आ. चिखलीकर यांचा विजय सहजसोपा झाला.या निकालामुळे हे अधोरेखित झाले की,यापुढे मतदार व कार्यकर्त्यांशी संवाद कायम टिकवून ठेवणे गरजेचे असून विकासकामे सुद्धा तितकेच गरजेचे आहे.

### भाई धोंडगेंनंतर प्रतापराव पाटील चिखलीकर

**प्रतापराव पहिल्यांदा २००४ मध्ये अपक्ष म्हणून लोहा-कंधार विधान सभेतून निवडून आले. २००९ मध्ये पराभूत झाले. २०१४ मध्ये शिवसेनेकडून आमदार झाले.२०१९ मध्ये नांदेडचे खासदार तर २०२४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून ते यावेळी विधानसभेत गेले. विजयाची हैद्रट्रिक साठी भाई धोंडगे नंतर त्याची ही कामगिरी केली.**

# दिवाळी अंक हे लिहित्या हातांचे दिशा दर्शक असतात-कवी प्रा.वा.ना.आंधळे

## साप्ता.बडगुजर उवाच दिवाळी अंकाचा दिमाखदार प्रकाशन सोहळा संपन्न




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जळगाव । प्रतिनिधी**

दिवाळी अंकांनी लेखनकर्त्यांच्या किती तरी पिढ्या समृद्ध केल्या.त्यांना जनमानसात ओळख मिळवून दिली.महाराष्ट्रातून किती तरी वृत्तपत्रे आणि दिवाळी अंक प्रकाशित होतांना दिसतात. साप्ताहिक बडगुजर उवाच आणि साप्ताहिकाचा दिवाळी अंक जिल्ह्याच्या साप्ताहिक विश्वात आपली ओळख पंचेचाळीस वर्षांपासून टिकवून आहे.ही बाब निश्चितच अभिनंदनीय आहे.असे भावोदगार खान्देशातील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी उपस्थितांसमोर व्यक्त केले.जळगाव येथील साप्ताहिक बडगुजर उवाच च्या दिवाळी अंकाचा प्रकाशन समारंभ आज दि.२४ नोव्हेम्बर २०२४ रोजी सकाळी दहा वाजता एम आय डी सी एरिया,राजस गृहोद्योग मंदिर जळगाव येथे संपन्न झाला.दिवाळी अंकाचे प्रकाशन प्रा.आंधळे यांचे शुभहस्ते करण्यात आले.त्याप्रसंगी ते बोलत होते.सामारंभाच्या अध्यक्षस्थानी पहुर येथील लोकप्रिय डॉ.रविंद्र वसंतराव बडगुजर होते.

प्रा.आंधळे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की बडगुजर उवाचचे संस्थापक संपादक कवी तथा लेखक श्री.द.शं. बडगुजर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून केलेली लोकसेवा आणि समाजसेवा स्पृहणीय असून तोच वारसा वसा म्हणून त्यांचा सुपुत्र नरेंद्र बडगुजर व सौ.दिपाली बडगुजर,यांनी समर्थपणे पेलल्याचे समाधान त्यांनी नोंदवले.त्याचवेळी द.शं दादा व सौ.प्रमिला वहिनी बडगुजर यांच्या श्रमनिष्ठेचाही मनस्वी गौरवोल्लेख करतांना दिवाळी अंकास देखणं रूप देणारे खगेंद्र बडगुजर यांच्या कलात्मक दृष्टीचेही कौतुक करीत संतोष बडगुजर आणि परिवारातल्या इतर सदस्यांना दिवाळी अंकाचे श्रेय दिले. समारंभाच्या प्रमुख मान्यवरांची व समारंभ अध्यक्षांची मनोगते सदर प्रसंगी यथोचित झालीत.त्यात बापूसाहेब विठ्ठल ओंकार बडगुजर,अहिराणी साहित्य परिषद धुळे या संस्थेचे अध्यक्ष प्रा.भगवान पाटील,शिरपूर बडगुजर समाजाचे अध्यक्ष धर्मेंद्र पोपटराव बडगुजर व डॉ.रविंद्र बडगुजर यांनी आपल्या। सद्भावना नोंदवीत शुभेच्छा दिल्या.

समारंभास जिल्ह्यातून समाज बांधव तसेच साहित्यिक डॉ.बापूराव देसाई, कवी भगवान भटकर,कवयित्री इंदिरा जाधव,विजय हिरालाल करोडपती,कवी तथा शाहीर निंबा पुना बडगुजर यांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सांगता कवी निंबा बडगुजर यांनी लिहिलेल्या पोवाड्याने करण्यात आली.सूत्र संचलन व आभार प्रदर्शन प्रकाश बडगुजर सरांनी केले.

# नांदेड जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीत भाजपचे ५,शिवसेनेचे ३ तर राष्ट्रवादी काँग्रेसचा १ उमेदवार विजयी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड जिल्ह्यातील नऊ विधानसभेचे निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. रात्री उशिरापर्यंत आलेल्या निकालानुसार किनवट येथून भाजपचे भिमराव केराम, हदगाव मतदारसंघातून शिवसेनेचे बाबुराव कदम कोहळीकर, भोकर विधानसभेतून भाजपाच्या श्रीजया अशोकराव चव्हाण, नांदेड उत्तरमधून शिवसेनेचे बालाजी कल्याणकर, नांदेड दक्षिणमधून शिवसेनेचे आनंद तिडके, लोहा विधानसभेतून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतापराव पाटील चिखलीकर, नायगाव मतदारसंघातून भाजपचे राजेश पवार, देगलूरमधून भाजपचे जितेश अंतापूरकर तर मुखेड विधानसभा मतदारसंघातून डॉ. तुषार राठोड हे विजयी झाले आहेत.

नांदेड जिल्ह्यामध्ये नऊ विधानसभांपैकी भारतीय जनता पार्टीला ५ जागा, शिवसेना ३, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी १ अशा एकुण ९ जागा निवडून आल्या आहेत. तर विधानसभेसोबतच झालेल्या लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार रविंद्र चव्हाण विजयी झाले आहेत आज झालेल्या विधानसभा निवडणुकीतील विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे आहे.

८३-किनवट विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे उमेदवार भिमराव रामजी केराम यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवारचे जाधव प्रदीप नाईक यांचा ५६३६ एवढ्या मतांनी पराभव केला आहे. या निवडणुकीमध्ये भिमराव रामजी केराम यांना ९२८५६ मते मिळाली तर जाधव प्रदीप नाईक यांना ८७२२० मते मिळाली आहेत. यामध्ये उमेदवार जाधव सचिन माधवराव (नाईक) यांना ५५११ तीसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर चौथ्या क्रमांकावर अशोक संभाजीराव ढोले यांना ५३११ मते मिळाली आहे.

८४-हदगाव विधानसभेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार माधवराव पाटील जवळगावकर यांचा ३००६७ एवढ्या मतांनी पराभव केला आहे.या निवडणुकीमध्ये बाबुराव कदम कोहळीकर यांना ११३२४५ मते मिळाली तर माधवराव पाटील जवळगावकर यांना ८३१७८ मते मिळाली आहेत. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दिलीप आला राठोड यांना ११४०९ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे उमेदवार देवसरकर माधव दादाराव यांना १२७६ चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत.

८५-भोकर विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार श्रीजया अशोकराव चव्हाण यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे तिरूपती उर्फ पप्पु बाबुराव कदम कोंढेकर यांचा ५०५५१ एवढ्या मतांनी पराभव केला आहे. या निवडणुकीमध्ये श्रीजया अशोकराव चव्हाण यांना १३३१८७ मते मिळाली तर तिरूपती उर्फ पप्पु बाबुराव कदम कोंढेकर यांना ८२६३६ मते मिळाली आहेत. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार सुरेश टिकाराम राठोड यांना ८८७२ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर बहुजन समाज पार्टीचे कमलेशकुमार पांडूरंगराव चौदंते यांना १६६४ चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत.

८६-नांदेड उत्तर विधानसभेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे उमेदवार बालाजी कल्याणकर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अब्दुल सत्तार अ गफुर यांचा ३५०२ एवढ्या मतांनी पराभव केला आहे. या निवडणुकीमध्ये बालाजी कल्याणकर यांना ८३१८४ मते मिळाली तर अब्दुल सत्तार अ गफुर यांना ७९६८२ मते मिळाली आहेत. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रशांत विराज इंगोले यांना २४२६६ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या संगीता विठ्ठल पाटील यांना २२७०६ चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत.

८७-नांदेड दक्षिण विधानसभेच्या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार आनंद शंकर तिडके यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मोहनराव हंबर्डे यांचा २१३२ एवढ्या मतांनी पराभव केला आहे. या निवडणुकीमध्ये आनंद शंकर तिडके यांना ६०४४५ मते मिळाली तर मोहनराव हंबर्डे यांना ५८३१३ मते मिळाली आहेत. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार फारुक अहमद यांना ३३८४१ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर दिलीप कंदकुर्ते यांना १७१७० चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत.

८८-लोहा विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे एकनाथ रावसाहेब पवार यांचा १०९७३ एवढ्या मतांनी पराभव केला आहे. या निवडणुकीमध्ये प्रतापराव पाटील चिखलीकर यांना ७२७५० मते मिळाली तर एकनाथ रावसाहेब पवार यांना ६१७७७ मते मिळाली आहेत. जनहित लोकशाही पार्टीचे उमेदवार चंद्रसेन ईश्वरराव पाटील (सुरनर) यांना २९१९४ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर प्रा. मनोहर बाबाराव धोंडे यांना २०३०२ चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत.

८९-नायगाव विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे राजेश संभाजीराव पवार यांनी राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार डॉ. मीनल पाटील खतगावकर यांचा ४७६२९ एवढ्या मतांनी पराभव केला आहे. या निवडणुकीमध्ये राजेश संभाजीराव पवार यांना १२९१९२ मते मिळाली तर डॉ. मीनल पाटील खतगावकर यांना ८१५६३ मते मिळाली आहेत. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. माधव संभाजीराव विभुते यांना १६०४३ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर प्रहर जनशक्ती पार्टी गजानन शंकरराव चव्हाण यांना २१४४ चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत.

९०-देगलूर विधानसभेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार निवृत्ती कोंडीबा कांबळे सांगवीकर यांचा ४२९९९ एवढ्या मतांनी पराभव केला आहे. या निवडणुकीमध्ये जितेश रावसाहेब अंतापूरकर यांना १०७८४१ मते मिळाली तर निवृत्ती कोंडीबा कांबळे सांगवीकर यांना ६४८४२ मते मिळाली आहेत. प्रहर जनशक्ती पक्षाचे उमेदवार साबणे सुभाष पिराजीराव यांना १५९१९ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार देगलुरकर सुशिलकुमार विठ्ठलराव यांना ५४०३ चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत.

९१-मुखेड विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे तुषार राठोड यांनी राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांचा ३७७८४ एवढ्या मतांनी पराभव केला आहे.

या निवडणुकीमध्ये तुषार राठोड यांना ९८२१३ मते मिळाली तर हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांना ६०४२९ मते मिळाली आहेत. बालाजी नामदेव खतगावकर यांना ४८२३५ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली तर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रावसाहेब दिगांबरराव पाटिल यांना ४७०० चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904